लोकनेते डॉ.बाळासाहेब विखेपाटील (पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित)
प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कोल्हार
ता.राहाता जि.अहमदनगर पिन-४१३७१०
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे
मराठी विषयाचा  पुनर्रचित अभ्यासक्रम जून २०२० पासून
SYBA (G2)
Choice Based Cretit System [CBCS]
सत्र पहिले
आधुनिक मराठी साहित्यप्रकार कादंबरी (रारंग ढांग)[CC-1C(3)]

प्रा.डॉ.राजेंद्र वडमारे
(मराठी विभाग प्रमुख)

---

**कादंबरीचे प्रत्यक्ष वाचन आणि टिपण**

**०१. प्रास्ताविक**

जाणकार वाचकांकडून अपेक्षित असलेली कादंबरी या साहित्यप्रकाराविषयीची सूक्ष्म वाचन- टिपणप्रक्रिया अरुण साधू यांच्या 'सिंहासन',या महत्त्वाच्या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने पडताळून बघितली आहे. रारंग ढांग ही कादंबरी अभ्यासताना विद्यार्थ्यांना पूरक टिपण म्हणून याचा उपयोग होईल.

**०२.<u>सिंहासन</u>**

(दिनकर गांगल,ग्रंथाली प्रकाशन, - मुंबई, प.आ. १९७७)
( १९७७ पूर्वीचे वातावरण. मराठीतील राजकीय कादंबरी अस्तंगत झाली हो ती. ती 'सिंहासन', 'कामायनी' यांच्या रूपाने पुन्हा एकदा नव्याने आली.)

**२.१. <u>'सिंहासन' ही सत्तास्पर्धेची कादंबरी</u>**

राजकीय पण मर्यादित अर्थाने सत्ताधारी × विरोधी पक्ष हा झगडा नाही.निरनिराळ्या मुद्द्यांवर जनतेची आंदोलने उभी करून विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यांशी लढा देतो , असा झगडा नाही . सत्ताधारी पक्षाचेही पूर्ण चित्रण नाही . प्रांतिक पातळीवर राजधानी त चालू असणारी पक्षांतर्गत सत्तास्पर्धा एवढा च विषय . सत्ताधारी पक्षातील आमदार , त्यांचे गट , मंत्री, मुख्यमंत्री पदासाठी इच्छुक असलेल्यांची धडपड , आजचे मंत्री इ . सत्तास्पर्धेतील डावपेच.पेचप्रसंग निर्माण करू न मुख्यमंत्री होऊ इच्छिणारे अर्थमंत्री दाभाडे व सिंहासनावर घट्ट बसून राहणारे मुख्यमंत्री यांच्यातील संघर्ष . सगळे गतिमान, नाट्यमय, म्हणून वाचकाला आवडते.

**२.२. <u>राजकीय सत्तास्पर्धेचे तपशीलवार व जिवंत वर्णन</u>**

यापूर्वी मराठी त कधी आलेले नाही . (मराठी राजकीय कादंबरी स्वातंत्र्यपूर्व काळात काल्पनिकतेच्या पातळीवर वावरताना दिसते. आता 'सिंहासन', 'कामायनी', 'मुख्यमंत्री', 'साता उत्तराची कहाणी ' यांच्या रूपाने ती स्वातंत्र्योत्तर वास्तव टिपू लागली आहे. नवी राजकीय कादंबरीच्या मुळाशी 'सिंहासन'.)

**२.३. <u>'सिंहासन' वाचताना इतिवृत्त वाचल्याचा भास</u>**

(ही मर्यादा नसून सामर्थ्य आहे.)

विदर्भाचे नेते दाभाडे विरोधी पश्चिलम महाराष्ट्राचे नेते मुख्यमंत्री असा संघर्ष महाराष्ट्रात कधी झाला नाही. हे न घडलेल्या घटनांचे वर्णन आहे . तरीही घडलेल्या घटनांच्या वर्णनाइतके सत्य व जिवंत. प्रत्यक्षातील विशिष्ट घटना, व्यक्तिरेखा नसूनही हे सगळे खरेखुरे वाटू लागते. नेमके हेच घडले आहे असे नाही, पण यासारखे खूपसे नेहमीच आपल्याभोवती घडत राहते , ही जाणीव महत्त्वाची आहे . हे सार्वत्रिक सत्य एखाद्या विशिष्ट सत्यासारखे खरे वाटते, हे यश.

मुख्यमंत्री अदृश्य. सार्वत्रिक अस्तित्व . स्पर्धेतील एक केंद्र अदृश्यपणे सर्वत्र उपस्थित आहे . ते सर्वत्र निर्णायकपणे घाव घालते. ही इतिवृत्तापेक्षा निराळ्या रचनेचे खूण.

संवादात विविधता. तो कळावा म्हणून भाषण चतुरपणे भाष्य. निसर्गवर्णन, वातावरणनिर्मिती घटनांची विविधता, मानससंघर्ष. पुरात सापडल्यासारखे वाचकाला आपल्याबरोबर घेऊन जाणारे प्रभावी निवेदनतंत्र आहे. हे तंत्र अनेक काळजीपूर्वक रचलेल्या बाबींची कृत्रिमता जा णवू देत नाही .पाश्चिमात्य लोकप्रिय कादंबरीचे (आर्थर हेली, फ्रेडरिक फोरसिथ, हेराल्ड रॉबिन्स) घटक मराठीत आत्मसात करण्याचा प्रयत्न.

गती नसताना गतिमानते चा प्रत्यय आणून देते .पंधरा-वीस दिवसांचे कथानक . घडेल घडेल म्हणून गाजणारा संघर्ष प्रत्यक्षात घडण्यापूर्वी च ओसरतो . युद्धाला तोंड लागण्यापूर्वीच ओस रते. दाभाडे मंत्रिमंडळाबाहेर जातात. फारसे काही घडत नसताना खूपसे घडत आहे असे जाणवत राहते.

**२.४. <u>कथानकाची घट्ट वीण</u>**

राजकीय घटना सामूहिक घटना असते. तिचे धागेदोरे लांबरुंद, इतस्तत: पसरलेले असतात. अनेक थर, पदर, गुंतागुंती, हितसंबंध यांचे एका सुसंबद्ध आकृतीत दर्शन घेण्यात यश.

अतिशय रेखीव, घट्ट वीण असणारी कादंबरी आणि तितकीच अघळपघळ , विस्कळीत आणि शिथील असलेली कादंबरी असे दुहेरी रूप . सगळे विस्कळीत , ऐसपैस आणि तरीही सगळे पक्के बांधलेले असे कथानक.

रेखीव पण विस्कळीत, घट्ट पण इतस्तत: पसरलेले असेच राजकारण असते. तसेच हे कथानक आहे . गुंतागुंतीची सामूहिक घटना शब्दबद्ध करण्याची धडपड असणाऱ्या सर्व कलाकृतीं चे स्वरूप स्थूलपणे असेच असणार.

(अनेक व्यक्तींच्या वैयक्तिक कहाण्या . धावत्या चरित्ररेखा माणसाची . माणसाची जडणघडण. केस हिस्टरीज. त्यातून व्यक्तिमनाची गुंतागुंत. व्यक्तिजीवनाचा भावस्पर्श. या व्यक्तींच्या जीवनात व्यक्तिगत पातळीवर एक महत्त्वाची घटना घडत असते . जखमी डि .काष्टाच्या तोंडून नीलाचे नाव ऐकून तिच्या प्रेमाविषयीची संदिग्धता नाहीशी होते आणि त्याला मोकळे वाटू लागते . ही महत्त्वाची व्यक्तिगत घटना सामूहिक भव्य घटनेचे उपांग असते . एका मध्यवर्ती घटनेच्या परिघावर अनेक व्यक्ती उभ्या. त्यांच्या व्यक्तिजीवनातील तीव्र क्षण व मध्यवर्ती सामूहिक घटनेतील तीव्र क्षण एकमेकात मिसळतात . अशाप्रकारे सामूहिक आणि व्यक्तिगत, घट्ट व सैल, प्रमाणबद्ध व विस्कळीत असे रूप . व्यापक समूहजीवन अनेक

गुंतागुंतीच्या व्यक्तिजीवनातून साकार होते. म्हणून ते मूर्त, प्रत्यक्ष होते.) समाजलक्षी म्हणून वास्तवाचे व्यापक भान, व्यक्तीलक्षी म्हणून भावशील.

या कहाण्या वेगवेगळ्या ठिकाणाहून सुरू होतात . पण त्या कुठूनही सुरू झाल्या तरी वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या पातळीवरून त्या एका केंद्राकडे वहात असतात. यादृष्टीने कथानकाची घट्ट वीण आणि कथानकाचा ऐसपेस विस्कळितपणा यातील गुंतागुंत पहा→

(अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे, मराठवाड्याचे नेते माणिकराव पाटील, कोकण नेते लांजेकर, महसूल मंत्री दत्ताजीराव, वार्ताहर दिगू टिपणीस, पक्षाध्यक्ष शिवाजीराव राणे)

विश्वासरावांना शह देण्यासाठी दलित मंत्री बुधाजी गोडघाटे याला कैचीत . त्यासाठी नानासाहेब गुप्ते यांचा वापर. दाभाडे यांचे सहकारी फोडण्यासाठी राज्यमंत्री आनंदराव टोपले यांच्याद्वारे आमदार जीवनराव वाघमारे यांना हाताळ ले आहे. टोपल्यांना अडचणीत आणण्यासाठी दाभाडे यांनी रावसाहेब टोपले यांचे प्रकरण वृत्तपत्रातून उकरून काढले आहे.

एका सामूहिक घटनेचे दहा प्रमुख भाग. त्यात काही प्रमाणात परस्परांपेक्षा वेग ळ्या, काही प्रमाणात परस्परांशी मिसळून गेलेल्या. वर्तमानातील निर्णय भूतकाळाशी बांधलेले म्हणून घट्ट, रेखीव कथानक. या घट्ट विणीच्या आत विस्कळीतपणा लपलेला आहे.

राजकारण हा माणसांच्या जीवनाचा सगळा भाग नसतो . त्याखेरीज कौटुंबिक/ खाजगी जीवन. खाजगी जीवनाचे धागे सार्वजनिक जीवनात मिसळतात , मिसळतही नाही त.विश्वासरावांची पहिली बायको, तिचा मृत्यू, दुसरी पत्नी, मुलगा, राजकारणात रस घेणारी सून या धाग्यापासून विश्वासराव मोकळेही नाही त आणि हे धागे त्यांच्या राजकारणाशी एकजीवही नाहीत.(पान १८-- टोपले प्रकरण), दिगू, त्याचे कौटुंबिक जीवन, त्याची मोलकरीण इला, तिचे मंत्री बुधाची गोडघाटेशी असलेले नाते.

(एका माणसाचे दुसऱ्या माणसाशी असणारे संबंध अशी साखळी. फक्त पहिला माणूस पाहिला तर तो केंद्राची घट्ट बांधलेला असतो. हा घट्टपणा त्याच्या इतरांशी असणार्यांट संबंधातून आलेला आहे. पण फक्त शेवटचा माणूस पाहिला तर तो सु टा वाट तो. त्यामुळे विस्कळीतपणाचा, भरगच्चपणाचा भास होतो . समूहचित्रणाच्या दृष्टीने तो महत्त्वाचा आहे. दुसऱ्या बाजूने राजकारण आणि सामान्य माणूस याचे संबंध ओझरते स्पष्ट होता त.व्यक्तिजीवनाची अनेक वर्तुळे मिळून समूहजीवनातील केंद्रवर्ती वर्तुळ घडविता त. त्यातील संबंधित भागामुळे घट्टपणा येतो. त्यातील व्यक्तिजीवनाशी संबंधित पण समूहजीवनाशी असंबंधित भागांमुळे विस्कळीतपणा येतो. विस्कळीतपणामुळे स मूहदर्शनाचा भास होतो. बांधीवपणामुळे आकर्षकत्व. वेड लावणा रे कथानक.) या सार्याळ कहाण्यामुळे कादंबरीत ऐसपैसपणा व मोकळेपणा येतो . आणि तो अतिशय रेखीव व बंदिस्त अशा घट्ट विणीच्या कथानकाला एकदम स्वाभाविक व जिवंत रूप देतो.

**२.५. <u>व्यक्तिरेखांची समृद्ध, वैशिष्ट्यपूर्ण आणि जिवंत मांडणी</u>**

दाभाडे शेतकऱ्यांचे मित्र, गरिबांचे मित्र दाखवण्याची धडपड, पण त्यामागे एक सत्तापिपासू, त्यासाठी कठोर निर्दयपणे जाणारा बेदरकार आतल्या गाठीचा माणूस दडला आहे. महादेव गाडेकर वांझ संताप,उच्चभ्रू दत्ताची जाधव, सुशिक्षित पण असंस्कृत वसंतराव दाभाडे , आडदांड माणिकराव पाटील , स्वाभिमानी श्रीपतराव शिंदे,

**२.६. <u>निसर्गवर्णने/संवाद</u>**

विविध थरातील जीवनाचे चित्र ण. राजधानी , मुख्यमंत्र्यांपासून झोपडपट्टीपर्यंत . राजकारण, त्यातील विविध धागे, गुंतागुंत याबरोबर कौटुंबिक जीवन, खाजगी जीवन, त्यांची गुंतागुंत पकडण्याचा मोठा प्रयत्न. जिवंत व्यक्तिरेखा व गतिमान निवेदनाशी एकजीव. म्हणून सफल कादंबरी.

**<u>२.७. निवेदनाला तुच्छतेची किनार</u>**

"दिगू टिपणीसासारखा एखादा बुडबुडा आतला दुर्गंधी वायू बरोबर घेऊन वर येऊन फुटत असतो". दिगू बुडबुडा आहे. तो प्रवाह बदलू शकत नाही . तो दुर्गंधी सोडणारा . म्हणून निवेदनाला तुच्छतेची किनार . उपरोध, उपहास तुच्छतेची झा लर. जे जिंकतात आणि जे हरतात ते सगळे जणू स्वार्थाच्या परिघात वावरणारे तुच्छ , क्षुद्र आहे त या जाणिवेतून हे सगळे लिखाण आ लेले आहे. ते वाचल्यावर राजकारणाविषयी एक अलिप्त उबग निर्माण होतो. 'सगळेच चोर राजकारणात' हे म्हणणाऱ्या सामान्यांचा संताप. पण तेही तडजोडी, तत्वच्युतीतून मुक्त नसतात.

**०३. <u>सिंहासन : मर्यादा</u>**

आत्तापर्यंत सत्तास्पर्धेतील एवढी संमिश्रता व गुंतागुंत मराठीत प्रथमच. पण ती पुरेशी आहे काय?

१. प्रांतिक स्पर्धेच्या वर केंद्रीय नेते, लोकसभा यांचा एक थर असतो. त्यांचे हस्तक्षेप असतात. हा थर येथे चित्रित झालेला नाही. विधानसभेच्या खाली साखर कारखाने, फळ बागायतदार, सर्व सहकारी क्षेत्रे, जिल्हा परिषद यांचा थर असतो. हा दाखवला आहे. सचिव व सचिवालय हे ही केवळ साक्षी नसते.

२. राजकारणात नेत्यांचे अस्तित्व व त्यांचे जय व्यापक प्रश्नांची हा ताळणी ते कशी करतात यावर ठरते. एका नेत्याच्या मागे काही अनुयायी स्वार्थ आणि हितसंबंध यांच्या आधारे उभे राहू शकतात . पण राजकारणाला ही स्वार्थाची साखळी पुरत नाही . प क्षाला जी लाखांनी म ते मिळवाय ची असतात , ती स्वार्थाच्या साख ळीने जोडली जात नाही त. ती व्यापक प्रश्नांनी जोडली जातात . दलितांचे कल्याण , अल्पसंख्याकांचे हित रक्षण, औद्योगिक प्रगती , शेतीची पुनर्रचना , मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न , महाविदर्भाचे आंदोलन, कोकणविकास, कृष्णा- गोदावरी पाणी तंटा , सहकारी क्षेत्र की सार्वजनिक क्षेत्र , इत्यादी जनतेचे प्रश्न असतात . कोणत्याही आंदोलनाला लोकांचा पाठिंबा मिळू लागला की राजकीय नेते त्यात घुसून आपले नेतृत्व निर्माण करीत असतात . (शेतकरी आंदोलन, कामगार संप ) नेत्यांची शक्ती व्यापक प्रश्नांच्या हाताळणी तून येते . या व्यापक प्रश्नात प्रांत , प्रदेश , जात , धर्म यांच्यापासून आर्थिक,सामाजिक कार्यक्रमापर्यंत अनेक विषय येतात.

३. व्यापक प्रश्नांच्या बाबतीत नेते फार प्रामाणिक असतात असे नाही . पण अप्रामाणिक असतात असेही नाही. राजकारणात नुसता ध्येयवाद नसतो हे जितके खरे , तितकेच हेही खरे की राजकारण नुसती सत्तास्पर्धा नसते. तुम्हाला मुख्यमंत्री व्हायचे आहे, आम्हालाही व्हायचे आहे. मग आम्ही तुमच्या मागे का यावे? या प्रश्नाचे उत्तर अशा व्यापक भूमिकेत असते . विश्वासराव असा व्यापक प्रश्न हाती घेत नाहीत , ही कच्ची जागा आहे.

या व्यापक प्रश्नांवर च पुढची गणि ते अवलंबून असतात. पराभवानंतरही मा णसे पक्षाला चिकटून राहतात. सत्तेसाठी पक्षद्रोह हे राजकारण आणि असलेली सत्ता सोडून देणे हेही राजकारणच. (केंद्र- प्रांतात पराभव झाल्यानंतरही पक्षाचा मोठा भाग इंदिरा गांधींमागे होता.) यामागे स्वार्थ आहेच . पराभवातून विजयाकडे कोण नेईल याचा आडा खा. पण त्याचा आधार लाखो म ते कोण गोळा करी ल हा आहे . ती शक्ती येते व्यापक प्रश्नांच्या मधून . प्रलोभने सोडू न आयुष्य विरोधी पक्षात काढणारे लोक . सत्ताधारी

पक्षातही ध्येय वादासाठी सोसणारे आणि विशिष्ट मर्यादेपर्यंतची तडजोड पुरणार नसेल तर सत्तेबाहेर जाऊ असे म्हणणारे लोक असतात.

४.अरुण साधूंनी खूपच गुंतागुंत पक डली हे मान्य केल्यावरही वरचा लोकसभे चा/ केंद्रीय हस्तक्षेपाचा , खालचा पक्षाला आधार देणाऱ्या शक्तीचा आणि राजकारणाला गती देणाऱ्या व्यापक प्रश्नांचा विचार केलेला नाही. म्हणून त्यांचे राजकारण एकापरीने स्वप्नात ले आहे. येथील खरेपणा फारसा खरा नाही . ज्या चित्रणात नातीगोती आणि सत्तास्पर्धा इतकाच भाग येतो पण ज्या ठिकाणी राजकीय ध्येयवाद आणि भूमिका यांचा गंभीरपणे विचार नसतो, ते चित्र समाधानकारक असू शकत नाही. (राजकीय मन जाणताना आणि सांगताना) अरुण साधू तुच्छता व उपरोध यापेक्षा फार खोलवर जात नाहीत . म्हणून महत्त्वाचे घटक राहून जातात.

५. राजकारणात व्यक्तींवर गुन्हा शाबीत करून त्याला तुरुंगात पाठविणे गौण असते. तिला उघडे करणे, राजकीय नेतृत्व संपविणे , तिचा पाठिंबा संपविणे हे महत्त्वाचे असते . म्हणून नातेवाईकांचा पक्षपात , वशिलेबाजी, भ्रष्टाचार हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात . कामवासना व संबद्ध चारित्र्य गौण ठरते . या भानगडी राजकीय नेत्यात असतात पण त्यांचा दाब -दडपण्यासाठी वापर होत नाही. गोडघाटेच्या प्रेयसीचा अपघाती मृत्यू, नानासाहेब गुप्तांच्या पत्नीचा अपघाती मृत्यू , यामुळे ते कैचीत पकडले जातात . खून हा गुन्हा कालबाह्य होणा रा आहे. ज्याच्या जीवनात स्त्रीविषयक भानगड आणि तिचा दडपलेला खून ही घटना नसेल तो माणूस मुख्यमंत्र्यांना आपल्या कह्यात ठेवता येणार नाही असे वाटू लागते.

६. मध्यमवर्गीय कुटुंबपरिघात वावरणाऱ्या माणसांना अशा स्त्रीविषयक भानगडी चविष्टपणे चघळाव्याशा वाटतात. राजकारणातील प्रलोभने / दडपणे यापेक्षा वेगळी अस तात. 'सिंहासन'मध्ये प्रत्येकाची कामवास ना गरजेहून अधिक जागा व्यापते . ही कामवासनाच राजकीय दडप णाचे हत्यार होऊ लागते . हे राजकीय मनाची खरे चित्र नाही . या कादंबरी वाच नीय करण्याच्या युक्त्या आहेत .मग योगायोगाची संख्या वाढते . वासनेची चित्रणे येतात. कादंबरी लोकप्रियतेच्या अंगाने जाते.

७. तरीही 'सिंहासन' ही रंजनात्मक, भडक, आकर्षक, उथळ कादंबरी नव्हे . ही मर्यादित यश लाभलेली साहित्यकृतीच आहे.प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे आकर्षक कथन, रिपोर्टाज नाही.-सार्वत्रिक सत्याचे, नेहमी घडू शकणाऱ्या घटनेचे चित्रण आहे .सार्वजनिक, कौटुंबिक , धाग्यांची गुंतागुंत करू न विविध व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घे त सामूहिक घनांची गुंतागुंत .समूहांचे स्वार्थ आणि व्यक्तींची अस्मिता यांच्या समन्वयाचे जे नानाविध सामाजिक , सांस्कृतिक आकार निर्माण होतात , त्यात राजकारण आहे . पण या सत्ताकांक्षी मनाचे खोल,तळ ढवळून टाकणारे, उपरोध- उपहासाची पातळी सोडणारे अंतर्वेदी चित्रण नाही.

८. कोणत्या कलाकृतीने जीवनाचा शोध किती खोलवर जाऊन घ्यावा याचे ठरलेले गणित नाही . पण वाचताना ते समाधानकारण , अपरिहार्य वाटले पाहिजे . 'सिंहासन"मध्ये ते फारसे गंभीर नाही असे वाटते.साधू सगळे वरवर पहात जातात,फारसे खोलात उतरत नाहीत.

९. वळणावळणाने सिंहासनाकडे जाण्याचा मार्ग शोधणा रे निरनिराळ्या भागातील निरनिराळ्या जातींचे , निरनिराळ्या पार्श्वभूमीचे मंत्री , आमदार, राजकीय कार्यकर्ते , त्यांना मदत करणा रे, अडचणीत आणणारे , संभ्रमीत करणारे वार्ताहर,एकीकडे आज्ञाधारकपणे वागणारे व दुसरीकडे स्वार्थसाधक धडवणारे सचिव, आणि हे सर्व जिच्यावर शेकते ती सामान्य जनता , एक दलित व एक आदिवासी, एक-दोन मध्यमवर्गीय, पण त्यांच्यावर फोकस नाही.

१०. सूक्ष्म, तपशीलवार, कधी उपरोधिक तर कधी अलिप्त शैली त चित्रण. निवेदनात समजू शकणारा, शहाणा कडवटपणा आहे. हे तणाव उलगडताना त्यातील वैय्यर्थ जाणवते.

∗ तीन तणाव →प्रादेशिकता,
→जातीयता (नातीगोती),
→ वैयक्तिक स्वार्थ,

११. राजकीय घडामोडींच्या स्वयंसिद्ध वेगाने पुढे जाणारी व म्हणून क्वचितच कंटाळवाणी वाटणारी कादंबरी.राजकीय तपशील हे सामर्थ्य. तो बिनचूक. त्याची मांडणी गुंतागुंतीची.आपल्या विषयक्षेत्राचे सूक्ष्म अवलोकन, तल्लख निवेदन. म्हणून बेस्टसेलर पद्धतीची कादंबरी. सामर्थ्य याच मर्यादा.

१२. घटना, व्यक्ती, समस्या यांची मुळे शोधली नाही त.राजकीय गुंतागुंतीची अत्यंत उघडी, ढोबळ कारणे.मानवी संबंधाची/कामजीवनाची गुंतागुंत केवळ उल्लेखाच्या पातळीवर. व्यक्ती ऐवजी गटावर लक्ष. म्हणून समाजवास्तवाच्या पातळीवर जात नाही.

१३. राजकारण म्हणजे केवळ उघडीवागडी स्पर्धा, एकमेकांचे गळे कापण्याची स्पर्धा, तत्वविचाराला राजकारणात स्थान नसते, अशी भूमिका घेऊन तपशील भरल्यामुळे व्यापक वास्तवाचे भान सुटले आहे. राजकारणात- सत्तास्पर्धेत तत्वाविषयी तडजोडी होतात, क्वचित ती गुंडाळली जातात. पण राजकारणात तत्वे असतात, मूल्ये असतात ही भूमिका रास्त-वास्तव ठरली असती.ती नसल्यामुळे राजकीय डावपेचांचे चटपटीत निवेदन एवढेच स्वरूप उरते.

१४. व्यापक प्रश्न नुसते प्रचाराचे वा पुस्तकी नसतात. व्यक्ती/कुटुंब/समाज/शासन यांचे संबंध अधिकाधिक सुसह्य करण्याची ते मार्ग असतात. ते व्यक्ती व समाज यांना श्रेयाचे आश्वासन देतात व त्यांचे सूचन करतात. अशा विचारांच्या बैठकीवर समकालीन मूल्ये तपासण्याचा, त्यातील संघर्ष रंगविण्याचा प्रयत्न नाही. म्हणून ‘सिंहासन” ही राजकीय कादंबरी बनत नाही.

*****